| MHPU230015332006 | दाखल दिनांक | : | २१.१२.२००६ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २१.१२.२००६ | | |
| | निकाली दिनांक | : | १३/०७/२०२६ | | |
| | कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | १९ | ०६ | २२ |

**खेड–राजगुरूनगर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता.खेड, जि.पुणे यांचे न्यायालयात**

समोर : पिठासीन अधिकारी

**अ.ज. गिऱ्हे**

**न्यायनिर्णय घोषित दिनांक १३/०७/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र.२५९/२००६**

**निशाणी क्र.**

**गुन्हा नोंदणी क्रमांक १५१/२००६**

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे अंमलदार, **खेड** पोलिस ठाणे, ता.खेड, जि.पुणे. |
| प्रतिनिधित्व | | श्री.व्ही. एस. डोळस. सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | | **मंगेश शिवाजी लोखंडे**<br>वयः– ४० वर्षे, व्यवसाय– शेती ,<br>रा. चिखल गावठाण, ता. खेड, जि. पुणे. |
| प्रतिनिधित्व | | श्री. दिपक सोमा पवळे आरोपीतर्फे विधिज्ञ |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेला दिनांक | २५/१०/२००६ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २५/१०/२००६ |
| दोषारोपपत्र दिनांक | २१/१२/२००६ |
| दोषारोप ठेवलेला दिनांक | ०३/०५/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवलेला दिनांक | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १३/०७/२०२६ |
| आदेश कोणता | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

| क्र. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केलेला दिनांक | आरोपीस जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोपीवर ठेवलेले गुन्हे | आरोपीस निर्दोष अथवा शिक्षा | आरोपीस देण्यात आलेली शिक्षा | भा.ना.सु.सं. क. ४६७ अन्वयेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मंगेश शिवाजी लोखंडे** | -- | -- | भा.दं.वि. ४५२ व मुंबई पोलीस कायद्याचे कलम ३७(१)(३) सह १३५ अन्वये | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |

## अ. अभियोगपक्ष :

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ. साक्षीदार क्र-१ | दत्तात्रय कांताराम वडगांवकर | तक्रारदार |

**ब. आरोपीचे बचावाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | –– | –– |

**क. न्यायालयीन साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. महत्वाची वस्तू**

| अ..क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | –– | –– |

**न्या य नि र्ण य**

( दि. १३/०७/२०२६ रोजी पारीत )

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम भा.दं.वि.४५२ व मुंबई पोलीस कायद्याचे कलम ३७(१)(३) सह कलम १३५ अन्वये दोषारोपपत्र ठेवून खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात पुढीलप्रमाणेः–**

२. दि. २५/१०/२००६ रोजी रात्री ८.०० वाजेचे सुमारास तक्रारदार दत्तात्रय कांताराम वडगावकर हे दुकान बंद करुन दुकानातील सोन्याचांदीचे दागिने घेवून त्यांचा नोकर रामेश्वर चिंचोलीकर बाजारपेठेतील दुसऱ्या दुकानात गेले. त्या दुकानातील नोकर धोंडीराम भाग्यवान दागिने घेवून तिघेजण जिन्याचे खाली आले असता त्यांची मुलगी वैष्णवी हिने त्यांना हाक मारुन त्यांच्याकडे कोणीतरी आले आहे असे सांगितले. त्यावेळी तीन इसम जिन्यातून खाली येत होते. त्यांच्यापैकी दोघेजण निघून गेले व एकाकडे त्यांनी चौकशी केली

असता रामदास ज्वेलर्स कोठे आहे याबाबत चौकशी केली व त्याने एक मोबाईल क्रमांक दिला व तो निघुन गेला. त्यानंतर त्यांनी सदर मोबाईल क्रमांकावर फोन लावला असता तो मोबाईल क्रमांक लॉक असल्याचे कळाले. त्यांना सदर इसमांवर संशय आल्याने त्यांनी सदर इसमांना पोलीस ठाण्यात हजर केले. तेव्हा त्यांच्या कंबरेला चाकु मिळून आला. त्यामुळे त्यांनी सदर इसमांविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

३. सदर तक्रारवरुन **गु.र.नं.१५१/२००६** भा.दं.वि. कलम ४५२ व मुंबई पोलीस कायद्याचे कलम ३७(१)(३) सह कलम १३५ अन्वये नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास करणेबाबत श्री.पी. जी. ढेबे पोलीस हवालदार ११७९ यांना आदेशित करण्यात आले. तपासी अधिकारी यांनी तपास करुन आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र पाठविले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द (निशाणी क्र.१३) कडे अन्वये दोषारोप निश्चीत करण्यात आला. तो आरोपीस मराठीत वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल केल्याने खटल्याची पुढील संपरीक्षा करण्यात आली. संपरिक्षेदरम्यान आरोपी गैरहजर असल्याने वेळोवेळी त्याचेविरुध्द अजामीनपात्र अधिपत्र काढण्यात आले. परंत आरोपी मिळून न आल्याने माझे पुर्व न्यायीक अधिकारी यांनी नि.क्र.१ खाली आदेश पारीत करुन आरोपीविरुध्द जाहीर उद्घोषणा काढण्यात आली. तरीदेखील आरोपी न मिळाल्याने शेवटी नि.क्र.१ खाली आदेश पारीत करुन माझे पुर्व न्यायीक अधिकारी यांनी प्रकरण सुप्त प्रकरण या वर्गवारीत ठेवून फौ.प्र.सं. कलम २९९ प्रमाणे पुरावा नोंदविण्याबाबत आदेश केलयाने तक्रारदार यांचा त्या अनुषंगाने पुरावा नोदविण्यात आला. तक्रारदाराने आरोपीविरुध्द काहीही न सांगितल्याने तसेच इतर साक्षीदार तपासणे निष्फळ ठरणार असल्याने व खटला साधरणतः २० वर्षे जुना असल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच आरोपीविरुध्द परिस्थितीविशेष खुलासा करणेइतपत पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीस फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे निवेदनातून सुट देणेत आली.

५. आरोपीविरुद्धचा दोषारोप व अभियोगपक्षाचे साक्षीदारांचा अभिलेखावरील पुरावा विचारात घेता खालील मुद्दे खटल्याचे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे शाबीत करतो काय की, दि. २५/१०/२००६ रोजी रात्री ८.०० वाजेचे सुमारास आरोपीने तक्रारदार दत्तात्रय कांताराम वडगावकर यांच्या घरात दुखापत करण्याच्या हेतुने अनाधिकाराने प्रवेश केला ? | **..नाही** |
| २. | अभियोगपक्ष असे शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीच्या ताब्यातुन चाकू मिळुन आली व त्याद्वारे त्यांनी मुंबई हत्यारबंदी कायदा कलम ३७(१)(३) चा भंग करुन कलम १३५ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | **..नाही** |
| ३. | काय आदेश ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अभियोग पक्षाने खटल्याचे पृष्ठ्यर्थ साक्षीदार क्र.१ तक्रारदार दत्तात्रय कांताराम वडगावकर (निशाणी क्र.२०), यांचा पुरावा नोंदविला.

### <u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u> –

७. तक्रारदार दत्तात्रय वडगावकर (सा.क्र.१) यांनी पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.२५/१०/२००६ रोजी ते मोतीचौक येथे भाडयाने घर घेवून राहत असताना सदर दिवशी तीन संशयीत इसम त्यांच्या घरी आले. त्यावेळी ते घरी नव्हते. त्यांनी त्यांच्या मुलीला ते घरी आहे का याबाबत विचारले. तितक्यात ते घरी आले तेव्हा मुलीने त्यांच्याकडे कोणतरी आल्याचे सांगितले. सदर इसमांनी त्यांना त्यांना दुसरीकडे जायचे होते, चुकून तुमच्याकडे आलो असे सांगून निघून गेले. त्यांना संशय आल्याने त्यांनी पोलीसांत तक्रार नि.क्र.२१ दिलीतक्रारदार यांनी तक्रारवरील त्यांची सही ओळखली, परंतू त्यामधील मजकुर नाकारला आहे. सदर संशयीत इसमांना त्यांनी नंतर कधीही पाहिले नव्हते अथवा पोलीसांनीही त्यांना सदर इसम कधीही दाखविले नाही, बरीच वर्षे झाल्याने ते सदर इसमांना पाहिल्यास ओळखू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

८. तक्रारदार (सा.क्र.१) यांच्या पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनाशी विरोधाभासी पुरावा दिलेला आहे. तसेच त्यांनी तक्रारीतील मजकुर नाकारलेला आहे. त्यांनी आरोपींना पाहिल्याचे अथवा पोलीसांनी आरोपी त्यांना दाखविल्याचे त्यांनी स्पष्ट नाकारले आहे. सदर इसम हत्यारासह सज्ज होवून गुनहा करण्याच्या उद्देशाने त्यांच्या घरात आला होता व त्याने गृह अतिक्रमण केले होते असे तक्रारदाराने सांगितलेले नाही. याशिवाय, मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये घोषित अधिसुचना देखील शाबीत झालेली नाही. तक्रारदार यांचा पुरावा विनाउलटतपास आहे तसा गृहीत धरला तरी सदर पुरावा आरोपीस दोषसिध्द धरण्यासाठी सक्षम नाही. सबब, सदर पुराव्यावरुन आरोपीविरुदचा दोषारोप शाबीत होत नाही.

९. तक्रारदाराने घटनेचे दिवशी आरोपीने तक्रारदार दत्तात्रय कांताराम वडगावकर यांच्या घरात दुखापत करण्याच्या हेतुने अनाधिकाराने प्रवेश केला व आरोपीच्या ताब्यातुन चाकू मिळुन आल्याचे सांगितलेले नाही व तसा पुरावा अभिलेखावर आलेला नाही व तसे शाबितही झालेले नाही. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आरोपीविरुद्धचा दोषारोप शाबीत होणेस सक्षम नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक स्टीलचा जांब्या अपिल कालावधीनंतर फौ.प्र.सं.कलम ४५२ अन्वये मा. जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्याबाबत आदेश करणे उचित होईल. सबब, आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र ठरतो.

११. सबब, उपरोक्त विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **मंगेश शिवाजी लोखंडे** यांची भारतीय दंड संहिता कलम ४५२ व मुंबई पोलीस कायद्याचे कलम ३७(१)(३) सह कलम १३५ अन्वयेच्या शिक्षापात्र अपराधातून फौ.प्र.सं.कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** जप्त मुद्देमाल एक स्टीलचा जांब्या (पी आर क्र.३६/२०१७) अपिल कालावधीनंतर मा. जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावा.

**३.** आरोपीने फौ.प्र.सं.क.४३७(अ) अन्वये रुपये ५,०००/- चा वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा द्यावा असे आदेशीत करण्यात येत आहे.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.**

Digitally signed by GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Date: 2026.07.13 15:14:45 +0530

(**अ.ज.गिऱ्हे**)

दिनांकः १३/०७/२०२६
खेड-राजगुरुनगर..

न्यायदंडाधिकारी वर्ग-१,
(न्यायालय क्र.१)
खेड-राजगुरुनगर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | योगश प्रकाश अंबुरे, श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | श्री. अ. ज. गिऱ्हे,<br>सह दिवाणी न्यायाधिश तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, खेड–राजगुरुनगर. |
| न्यायनिर्णयाची तारिख | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | १३/०७/२०२६ |